e Paper

आधुनिक शहरातील घडामोडी

# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | मंगळवार दिनांक 09/06/2026 | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 124 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# महाराष्ट्रात रेल्वे फाटकमुक्त होण्यासाठी पायाभूत सुविधा उभारा - मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : 'महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळा'मार्फत (महारेल) करण्यात येणाऱ्या एकूण 131 पैकी पहिल्या टप्प्यात 65 कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 'महारेल'च्या बैठकीत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्रात रेल्वे फाटकमुक्त होण्यासाठी पायाभूत सुविधा उभारण्यात याव्यात, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**




सह्याद्री अतिथिगृहात ही बैठक झाली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी दूरदृष्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक व आमदार प्रसाद लाड बैठकीस उपस्थित होते. राज्यातील सार्वजनिक बांधकाम आणि नगरविकास विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवर रेल्वे उड्डाण पूल, पादचारी पूल आणि रेल्वे मार्गाखालील (अंडर पास) रस्त्याची कामे महारेलमार्फत करण्यात येणार आहेत. त्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध निर्देश दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, संपूर्ण महाराष्ट्रात एकही रेल्वे मार्गावर फाटक राहता राहता कामा नये. रेल्वे फाटक मुक्त महाराष्ट्रासाठी रेल्वे पायाभूत सुविधा उभारण्यात याव्यात; तसेच महानगरांमध्ये रेल्वे मार्गाच्या आजूबाजूला असलेले वाढते शहरीकरण लक्षात घेता अशा भागात गरजेनुसार नागरिकांच्या सुलभ दळणवळणाकरिता पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात यावीत. मान्यता देण्यात आलेल्या 65 कामांमधील संबंधित रस्त्यांवरील 25 हजार ते 1 लाखापर्यंत 'टीव्हीयू' (ट्रेन व्हेईकल युनिट) असलेल्या आणि कमीत कमी भूसंपादन आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. वाढते शहरीकरण लक्षात घेता शहरांमधील रेल्वे पायाभूत सुविधांची 80 कामे नियोजित करण्यात आली आहेत. या कामांसाठी संबंधित महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांची समिती स्थापन करण्यात यावी. समितीने नियोजित कामाविषयी पडताळणी करावी. त्यानंतर ते काम महारेल हाती घेईल. ही कामे पूर्ण झाल्यास या भागातील नागरिकांना त्यांच्या मागणीआधीच पायाभूत सुविधा मिळतील, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नागपूर शहरात उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलावर चौकाच्या ठिकाणी भविष्यातील वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे. अशा ठिकाणी वाहतूक कोंडी टाळण्याच्या कार्यवाही करावी.

अमरावती- बडनेरा मार्गावरील जुना रेल्वे उड्डाण पूल असून याठिकाणी नवीन रेल्वे उड्डाणपूल उभारण्यात यावा. महारेलने कामांचे प्राधान्यक्रमानुसार टप्पे पाडावेत. पायाभूत सुविधांच्या कामांसाठी हुडकोकडून कर्ज उपलब्ध करून घ्यावे.

हुडकोने बँकांकडून कर्ज न घेता वेगळी व्यवस्था उभारून बाजारातील स्पर्धेचा अंदाज घेत शासनाला दिलेल्या कर्जावरील व्याज कमी आकारावे. त्याचबरोबर महारेल हे महामंडळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आणण्यासाठी कार्यवाही गतीने पूर्ण करावी. महारेलमार्फत पूर्ण करण्यात आलेल्या कामांचे देयक राज्य शासनाकडून तातडीने अदा करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

# सीजेपीचे पुढील आंदोलन आता पुण्यात!

## अभिजित दिपके यांची घोषणा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी शनिवारी राजधानी दिल्लीतील जंतर मंतर येथे आंदोलन करत कॉंक्रोज जनता पार्टी आणि या पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी देशातील राजकीय वर्तुळासह प्रसारमाध्यमे आणि जनतेचं लक्ष आपल्याकडे वेधून घेतलं होतं. दरम्यान, दिल्लीतील एकदिवसीय आंदोलनानंतर अभिजित दिपके यांनी अशी आंदोलने देशभरात करण्याचा इशारा दिला होता. दरम्यान, कॉंक्रोज जनता पार्टीने आता महाराष्ट्रीतील पुणे येथे आंदोलनाची हाक






दिली आहे. गुरुवार 11 जून रोजी हे आंदोलन पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठात करण्यात येणार आहे.या आंदोलनासंदर्भात अभिजित दिपके यांनी सोशल मीडियावर खास मराठीत पोस्ट शेअर करत माहिती दिली आहे. भेटूया पुण्यात, जय महाराष्ट्र असं अभिजित दिपके यांनी म्हटलं आहे. कॉक्रोज जनता पार्टीच्यावतीने हे आंदोलन गुरुवार 11 जून रोजी पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठामध्ये संध्याकाळी 4 वाजता आयोजित करण्यात आलं आहे. तसेच हे आंदोलन शांततापूर्ण मार्गाने होणार आहे, असेही कॉक्रोज जनता पार्टीच्यावतीने सांगण्यात आले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 09/06/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# चावीच्या वादातून दोन कुटुंबांमध्ये राडा; रॉड-काठ्यांनी हल्ला

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड प्रतिनिधी :युनूस खतीब

**खेड तालुक्यातील कोरेगाव खुर्द येथे मोटारसायकलच्या चावीवरून झालेला वाद हिंसक वळणावर पोहोचला असून, दोन कुटुंबांमधील संघर्षात रॉड आणि लाकडी काठ्यांनी मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात एका तरुणाचा हात फ्रॅक्चर झाला असून उत्तर म्हाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी भिमराव बाळू दोंद (वय 35, रा. दोंद वस्ती, कोरेगाव खुर्द) यांच्या वडिलांसोबत मोटारसायकलच्या चावीवरून झालेल्या बाचाबाचीच्या कारणावरून आरोपी बालाजी मोहीते आणि सौरभ मोहीते यांनी दोंद यांच्या घरासमोर येऊन शिवीगाळ व दमदाटी केली.

यानंतर आरोपींनी हातातील लाकडी काठी आणि लोखंडी रॉडने भिमराव दोंद यांना मारहाण करून दुखापत केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. तसेच भांडण सोडविण्यासाठी आलेले त्यांचे भाऊ नकूल दोंद यांनाही आरोपींनी बेदम मारहाण केली. या मारहाणीत नकूल यांच्या डाव्या हाताला गंभीर दुखापत होऊन कोपराजवळ फ्रॅक्चर झाले असून डोक्यालाही मार लागला आहे.

हल्ल्यानंतर आरोपींनी जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी उत्तर म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अद्याप अटकेबाहेर आहेत.

विशेष म्हणजे, याच घटनेसंदर्भात दुसऱ्या बाजूनेही परस्परविरोधी तक्रार दाखल झाल्याने कोरेगाव खुर्द येथील हा वाद अधिकच चिघळला असून परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# दिवाणी वादातून थरारक हल्ला घराला पेट्रोल टाकून आग

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड प्रतिनिधी : युनूस खतीब

**मावळ तालुक्यातील सदुंबरे येथे दिवाणी वादातून एका व्यक्तीच्या घराला पेट्रोल टाकून आग लावल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी संदीप अनंता गाडे (वय 41, रा. सदुंबरे, ता. मावळ) आणि आरोपी गणेश अनंता गाडे (वय 42) यांच्यात वडगाव न्यायालयात दिवाणी दावा प्रलंबित आहे. या वादाच्या कारणावरून आरोपीने शनिवारी (दि. 7 जून) पहाटे साडेतीनच्या सुमारास फिर्यादीच्या घराच्या मुख्य दरवाजावर पेट्रोल टाकून आग लावल्याचा आरोप आहे.

आगीमुळे घराचा मुख्य दरवाजा, सोफासेट, लाकडी कपाट तसेच संपूर्ण विद्युत वायरिंग जळून सुमारे 50 हजार रुपयांचे नुकसान झाले. मात्र, घरात अडकलेल्या संदीप गाडे

यांनी प्रसंगावधान राखत किचनची खिडकी फोडून बाहेर पडल्याने त्यांचा जीव थोडक्यात बचावला.

या प्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता 2023 च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रेळेकर करीत आहेत."दिवाणी वादातून थेट जीव घेण्याचा प्रयत्न" अशी चर्चा या घटनेनंतर परिसरात सुरु असून, या प्रकारामुळे सदुंबरे परिसरात खळबळ उडाली आहे.

# अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे संघभावनेने कामकाज करा

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी – शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनातील समन्वय, विश्वास आणि परस्पर सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. सर्व विभागप्रमुख, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे संघभावनेने काम केल्यास उद्दिष्टे वेळेत आणि गुणवत्तापूर्णरीत्या पूर्ण होऊ शकतात. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून प्रशासन अधिक कार्यक्षम आणि नागरिकाभिमुख बनविण्यास भर द्यावा, अशा सूचना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या.**



## आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे निर्देश

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा आज आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतला, त्यावेळी सूचना देताना ते बोलत होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, तृप्ती सांडभोर यांच्यासह विविध विभागांचे विभाग प्रमुख, क्षेत्रीय अधिकारी आणि अधिकारी, कर्मचारी ऑनलाईन सहभागी झाले होते.

बैठकीत अग्निशमन विभागाकडे इमारतींच्या ना हरकत दाखल्यांसाठी (एनओसी) प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या प्रक्रियेबाबत आढावा घेण्यात आला. या अर्जांच्या तपासणी व निर्गम प्रक्रियेत विलंब होऊ नये, तसेच प्रत्येक अर्ज निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करून नागरिकांना सेवा वेळेत उपलब्ध करून द्यावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. ही प्रक्रिया अधिक सुटसुटीत व परिणामकारक करण्यासाठी स्वतंत्र मानक कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

शहरातील विविध प्रभागांमध्ये अधिकृत हॉकर्स झोनची आवश्यकता लक्षात घेता, क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात योग्य व सुरक्षित जागांची पाहणी करून उपलब्ध करून द्यावी. या प्रक्रियेत स्थानिक लोकप्रतिनिधींचा, विशेषतः नगरसेवकांचा सक्रिय सहभाग घेऊन त्यांच्या सूचना व अभिप्राय विचारात घ्यावेत, जेणेकरून हॉकर्स झोन नियोजन अधिक व्यवहार्य आणि स्थानिक गरजांनुसार होईल, असेही नमूद करण्यात आले.

उद्यानांचे सुशोभीकरण, देखभाल आणि आधुनिकरण यावर भर देण्याच्या सूचना देखील यावेळी देण्यात आल्या. उद्यानांमध्ये नागरिकांना आकर्षित करण्यासाठी आणि तांत्रिक नवकल्पना राबवण्यासाठी एलईडी स्क्रीन बसविण्यात याव्यात. या स्क्रीनद्वारे महापालिकेचे विविध उपक्रम, जनजागृती संदेश तसेच आवश्यक माहितीपूर्ण व जाहिरात स्वरूपातील सामग्री प्रदर्शित करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले. यामुळे उद्यानांचा वापर केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता माहिती व जनजागृतीचे केंद्र म्हणूनही होईल, असेही ते म्हणाले. याशिवाय, नागरिकांमध्ये उद्यानांविषयी जागरूकता वाढविण्याच्या दृष्टीने विशेष उपक्रम राबविण्याचे आयुक्त यांनी सुचविले. अनेक नागरिकांना शहरातील विविध उद्यानांची माहिती नसल्याने, डिजिटल माध्यमांचा वापर करून जनजागृती करण्यावर भर देण्यात आला. त्याअंतर्गत रील्स स्पर्धेचे आयोजन करून तरुणाईचा सहभाग वाढवून उद्यानांमध्ये नागरिकांची उपस्थिती वाढविण्यावर भर द्यावा.

# ‘फक्त खेळायचं नाही, वर्चस्व गाजवायचं आहे’

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : भारतीय क्रिकेटमधील उदयोन्मुख युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याने आपल्या आक्रमक खेळीसह आता मोठी महत्त्वाकांक्षा देखील व्यक्त केली आहे. “फक्त खेळायचं नाहीये, तर वर्चस्व गाजवत खेळायचं आहे,” अशा शब्दांत त्याने आपल्या क्रिकेट प्रवासाबद्दल आणि भविष्यातील ध्येयांबद्दल स्पष्ट भूमिका मांडली.**



राजस्थान रॉयल्स संघाने शेअर केलेल्या एका व्हिडिओमध्ये वैभवने आपल्या कारकिर्दीबाबत मनमोकळेपणाने संवाद साधला. नुकतीच त्याची आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय टी-20 संघात निवड झाली असून, भारतीय संघात स्थान मिळवणारा तो सर्वात कमी वयाचा खेळाडू ठरला आहे.

आयपीएलमधील आपल्या धडाकेबाज कामगिरीमुळे वैभवने क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतले. स्पर्धेत त्याच्या आक्रमक फलंदाजीने अनेक गोलंदाजांना घाम फोडला. मात्र, वैयक्तिक विक्रमांपेक्षा संघाच्या विजयाला तो अधिक महत्त्व देत असल्याचे त्याने सांगितले.

“पुरस्कार, विक्रम आणि वैयक्तिक यश चांगले असतात. पण मला संघाला सामने जिंकून देणारा खेळाडू बनायचे आहे. लोकांनी माझ्याबद्दल बोलताना ‘हा खेळाडू मैदानात उतरला की सामना जिंकून देतो’ असे म्हणावे, ही माझी इच्छा आहे,” असे वैभवने म्हटले.

पुढील 10 ते 20 वर्षांच्या क्रिकेट कारकिर्दीकडे पाहताना त्याने मोठी स्वप्ने व्यक्त केली. “देशासाठी असो किंवा फ्रँचायझीसाठी, जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा माझ्या खेळाचा परिणाम दिसला पाहिजे. केवळ खेळण्यासाठी खेळायचे नाही, तर वर्चस्व गाजवत खेळायचे आहे. त्यासाठी मी सातत्याने कठोर मेहनत घेत आहे,” असेही तो म्हणाला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 09/06/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# अण्णा बनसोडे यांनी घेतला महापालिकेच्या विविध कामकाजाचा आढावा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी – विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी बैठक घेऊन पिंपरीतील विकासकामांची सद्यस्थिती, प्रशासकीय कामकाज तसेच प्रलंबित प्रकल्पांची प्रगती याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधला.**



महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी बैठकीदरम्यान त्यांचे स्वागत केले. शहरातील सुरू असलेल्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांची माहिती तसेच विविध विकासकामांची अंमलबजावणीबाबत आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी माहिती दिली.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, नगररचना विभागाचे उपसंचालक किशोर गोखले, उप आयुक्त अण्णा बोदडे, क्षेत्रीय अधिकारी मुकेश कोळप, कार्यकारी अभियंता विजय भोजणे, तसेच महानगरपालिकेतील विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान अण्णा बनसोडे यांनी पिंपरी विधानसभा मतदारसंघासह शहरातील विविध भागांमध्ये सुरू असलेल्या रस्ते विकास, पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्था, नगररचना, सार्वजनिक सुविधा आणि नागरी पायाभूत सुविधांशी संबंधित कामकाजाचा आढावा घेतला. प्रलंबित कामांना गती देणे, नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करणे तसेच विकासकामांमध्ये पारदर्शकता राखण्याबाबत त्यांनी सूचना दिल्या.

याशिवाय, महानगरपालिकेच्या वतीने सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची सद्यस्थिती, अडचणी व भविष्यातील नियोजन यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांनी संबंधित विषयांवर माहिती देत आवश्यक सुधारणा व उपाययोजनांबाबत विचार मांडले.

# अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत समर्थ पॅनेलचा दणदणीत विजय

**पुणे : अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीची मतमोजणी पूर्ण झाली असून, या निवडणुकीत मेघराज राजेभोसले यांच्या नेतृत्वाखालील समर्थ पॅनेलने एकहाती विजय मिळवत पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. पॅनेलमधील सर्व उमेदवार विजयी झाल्याने चित्रपट क्षेत्रातील सदस्यांनी समर्थ पॅनेलच्या नेतृत्वावर आणि कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा विश्वास व्यक्त केल्याचे स्पष्ट झाले आहे.**



## मेघराज राजेभोसले यांच्या नेतृत्वावर पुन्हा सदस्यांचा विश्वास

महामंडळाच्या 17 जागांसाठी निवडणूक जाहीर झाली होती. त्यापैकी 3 जागा बिनविरोध निवडून आल्याने उर्वरित 14 जागांसाठी मतदान घेण्यात आले. या 14 जागांवर समर्थ पॅनेलने सर्व जागा जिंकत दणदणीत विजयाची नोंद केली.

मेघराज राजेभोसले यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढविणाऱ्या समर्थ पॅनेलमध्ये सुनील महाजन, दीपक कदम, अजित शिरोळे, राज काझी, सुशांत शेलार, धनाजी यमकर, सुभाष नकाशे, शरद चव्हाण, प्रवीण पाटील, चैत्राली डोंगरे, रवींद्र गावडे, गणेश गारगोटे, विकास तोरणे या सर्व उमेदवारांचा समावेश होता. या सर्व उमेदवारांनी विजय मिळवत समर्थ पॅनेलचा संपूर्ण पॅनेल निवडून आणला.

या निकालामुळे अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळात पुढील पाच वर्षांसाठी समर्थ पॅनेलच्या नेतृत्वाखालील कार्यकारिणीकडे सूत्रे जाणार असून, महामंडळाच्या विकासासाठी आणि चित्रपट क्षेत्रातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी नव्या जोमाने काम करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. विजयानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना मेघराज राजेभोसले म्हणाले, “निवडणुकीच्या काळात विरोधी पॅनेलकडून आमच्यावर अनेक बेछूट आरोप करण्यात आले. मात्र आजच्या निकालातून महामंडळाच्या सभासदांनी ते सर्व आरोप स्पष्टपणे नाकारले असून, गेल्या दहा वर्षांत आम्ही केलेल्या कामावर विश्वास व्यक्त केला आहे. हा विजय आमच्या कार्याची पावती आहे. सभासदांनी दाखविलेल्या या विश्वासामुळे त्यांच्यासाठी अधिक समर्पितपणे आणि जोमाने काम करण्याची ऊर्जा मिळाली आहे. महामंडळाच्या सर्व सभासदांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. पुढील काळातही सर्व घटकांना सोबत घेऊन महामंडळाच्या विकासासाठी आणि मराठी चित्रपटसृष्टीच्या हितासाठी आम्ही कटिबद्ध राहू.”

विजयानंतर समर्थ पॅनेलच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा करत सदस्यांचे आभार मानले. महामंडळाच्या सर्व घटकांना सोबत घेऊन पारदर्शक, विकासाभिमुख आणि सर्वसमावेशक कामकाज करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968